





दैनिक निडर निर्भिड

# जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!








संपादक : जितेंद्र कायस्थ   Mob- 9822720784   Email- jansanchlan@gmail.com   RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे   अंक : २७९ वा   मंगळवार दि २० जानेवारी २०२६   पृष्ठ ८   किंमत ३ रुपये


# ठाकरेसेनेकडून मुंबई महापालिकेच्या विरोधीपक्ष नेतेपदाची माळ कुणाच्या गळ्यात? शिवडीतील नगरसेवकाचं नाव चर्चेत

**वृत्तसंस्था/मुंबई**

महानगरपालिकेची निवडणूक पार पडताच आता महापौर, सभागृह नेता, विरोधी पक्षनेता कोण होणार याकडे अनेकांचे लक्ष लागले आहे. महापालिका निवडणुकीत ६५ जागा मिळवणाऱ्या शिवसेना उबाठा पक्षाचा विरोधी पक्षनेता होणार आहे. पक्षाच्या चार माजी महापौरांकडे संभाव्य विरोधी पक्षनेता म्हणून पाहिले जात आहे. परंतु या पदाची धुरा यंग ब्रिगेडकडे द्यावी का, याचीही चाचपणी होत आहे. मुंबई महापालिका निवडणूक शिवसेना उबाठा आणि मनसेने एकत्र येत लढवली. यामध्ये उबाठाचे ६५ आणि मनसेचे सहा नगरसेवक निवडून आले. मनसेकडून गटनेते म्हणून यशवंत किल्लेदार यांची निवड करण्यात आली, तर काँग्रेसच्या गटनेतेपदी कुर्ला येथील नगरसेवक अश्रफ आजमी यांची निवड करण्यात आली आहे. गेल्या महापालिका निवडणुकीत शिवसेना सत्तेत आल्यानंतर सभागृह नेता म्हणून यशवंत जाधव यांच्यावर जबाबदारी दिली होती. नंतर ते स्थायी समितीचे अध्यक्ष झाल्याने, विशाखा राऊत यांची या पदी निवड झाली होती. त्यावेळी अडीच वर्षे विश्वनाथ महाडेश्वर आणि त्यानंतर किशोरी पेडणेकर या महापौर होत्या. गेल्या महापालिका निवडणुकीत शिवसेना उबाठा पक्षाकडून महापालिकेत विविध पदे भूषवलेल्या विशाखा राऊत, किशोरी पेडणेकर यांची नावे पुन्हा चर्चेत आहेत. विशाखा राऊत महापौर राहिल्या आहेत. माजी महापौर मिलिंद वैद्य आणि श्रद्धा जाधव हे स्पर्धेत आहेत. निवडून आलेल्या नगरसेवकांची नोंद ही बेलापूरमधील कोकण भवन येथे झाल्यानंतर, महापौराकडे विरोधी पक्षनेतेपदाचा प्रस्ताव जातो. उबाठा पक्षातील अनुभवी नगरसेवकांना पुन्हा जबाबदारी देण्याचा विचार होऊ शकतो.



यंदाच्या मुंबई महापालिका निवडणुकीत उमेदवारांच्या तिकीट वाटपात शिवसेना आमदार आदित्य ठाकरे आघाडीवर होते. त्यांच्याकडून यंग ब्रिगेडलाही जबाबदारी देण्याचा प्रयत्न होऊ शकतो. त्यामुळे दुसऱ्यांदा विजयी झालेले शिवडीतील नगरसेवक सचिन पडवळ यांच्यावरही विरोधी पक्षनेतेपदाची जबाबदारी दिली जाऊ शकते.

---

# नियम धाब्यावर! आरबीआयने नांदुरा अर्बन बँकेवर ठोठावला दंड

**जनसंचलन/ नांदुरा**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने महाराष्ट्रातील द नांदुरा अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, नादुरा या बँकेवर थेट कारवाई करत एक लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. आरबीआयने १३ जानेवारी २०२६ रोजी हा आदेश जारी केला असून, बँकिंग नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बँक व्यवस्थापनावर हा स्पष्ट इशारा मानला जात आहे. बँकिंग नियमन कायदा १९४९ च्या सेक्शन ४६ (४)() व ५६ अंतर्गत ही कारवाई करण्यात आली आहे. आरबीआयने ३१ मार्च २०२५ रोजी बँकेच्या आर्थिक स्थितीचे सखोल परीक्षण केले असता, नांदुरा अर्बन बँकेने आरबीआयच्या महत्त्वाच्या सूचनांचे पालन न केल्याचे उघड झाले. विशेष म्हणजे, बँकेने नाममात्र सदस्यांना नियमबाह्य व मर्यादेपेक्षा जास्त कर्ज मंजूर केल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी आरबीआयने कारणे दाखवा नोटीस बजावली होती. मात्र बँकेकडून सादर करण्यात आलेली कारणे समाधानकारक नसून, त्रुटी कायम असल्याचे




स्पष्ट झाले. त्यामुळे आरबीआयने दंडात्मक कारवाई करत बँक व्यवस्थापनाला धडा शिकवला आहे. दरम्यान, ही कारवाई केवळ आर्थिक दंडापुरती मर्यादित असल्याचे आरबीआयने स्पष्ट केले आहे. मात्र, नियमांकडे दुर्लक्ष करणाऱ्या सहकारी बँकांवर आरबीआयची नजर अधिक तीव्र झाल्याचे संकेत या कारवाईतून मिळत आहेत.

# माजी सैनिकांसाठी ङ्गआपदा मित्रफ प्रशिक्षण; २७ जानेवारीपर्यंत अर्ज मागविले

**जनसंचलन/बुलढाणा,**

: जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, बुलढाणा यांच्या वतीने जिल्ह्यातील माजी सैनिकांसाठी ङ्गआपदा मित्रफ प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आपत्तीच्या काळात तातडीने मदत कार्य करण्यासाठी माजी सैनिकांच्या अनुभवाचा वापर करण्याच्या उद्देशाने हे प्रशिक्षण दिले जाणार आहे. आपदा प्रशिक्षण ९ ते २० फेब्रुवारी २०२६ या कालावधीत होणार आहे. प्रशिक्षणादरम्यान सहभागी होणाऱ्या सर्व माजी सैनिकांची राहण्याची (निवासी), चहा, नाश्ता आणि भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच प्रशिक्षणामध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक आपदा मित्राला ५ लाख रुपयांचे विमा संरक्षण देण्यात येणार आहे. प्रशिक्षणासाठी माजी सैनिकाचे वय ४५ वर्षांपेक्षा जास्त नसावे. जिल्ह्यातील इच्छूक माजी सैनिकांनी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, बुलढाणा येथे दि. २७ जानेवारी २०२६ पर्यंत ओळखपत्र, पासपोर्ट साईज फोटो व आधार कार्डसह अर्ज विहित मुदतीत सादर करावे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त माजी सैनिकांनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, बुलढाणा यांनी केले आहे.

# ...महामुंबईतला तीळगूळ...

मुंबई महानगर प्रदेशातील नऊ महानगरपालिकांपैकी वसई-विरार व भिवंडी या महापालिका वगळता मुंबईसह उर्वरित सात महापालिकांमध्ये भारतीय जनता पक्ष-शिवसेना महायुतीच्या हातात विजयाचा तीळगूळ आला आहे. मात्र संपूर्ण राज्याचे, व खरे तर संपूर्ण देशाचे ज्या मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीकडे लक्ष लागले होते, तेथील भाजप-शिवसेनेची सरशी ही म्हणावी तेवढी थेट झालेली नाही. आणि त्यातूनच, उद्धव व राज या ठाकरे बंधूंना मुंबईत दुर्लक्षून चालणार नाही, हे शुक्रवारी रात्री उशिरापर्यंत जाहीर झालेल्या निकालांतून स्पष्ट झाले. शिवसेना (उबाठा) व मनसे ही युती ४५ ते ५० जागांपर्यंत पोहोचली तरी खूप झाले, अशा दबक्या आवाजातील खासगी चर्चा नंतर अनेक वृत्तवाहिन्यांवरून थेटही केल्या गेल्या. या भविष्याच्या खरेपणासाठी अनेकदा पोलिसांचा गुप्त विभाग ते सट्टाबाजारापर्यंतचे असंख्य दाखले दिले जात होते. मात्र, मुंबईतील मराठी माणूस हा मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीतील मतदान हे पाच वर्षांत केलेल्या कामाचा लेखाजोखा घेऊन करण्यापेक्षा ठाकरेंच्या शिवसेनेशी असलेल्या भावनिक नात्याच्या आधारावरच करतो, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले. मुंबईमध्ये १३५ उमेदवारांपैकी ९४ मराठी भाषक उमेदवार देऊनही त्यांना उत्तर भारतीय, गुजराती, मारवाडी मुंबईकरांनी पूर्ण ताकदीनिशी पाठिंबा दिला, हे विशेष. उद्धव व राज ठाकरे हे दोघे भाऊ खांद्याला खांदा लावून भाजपच्या समोर उभे राहिले व त्यामुळेच सत्ताधारी पक्षाशी लढणारे तेच प्रमुख पक्ष असल्याची भावना सर्व मुंबईभर होती. याचमुळे मुंबईतील मुस्लिम विभागांमधूनही त्यांना साथ मिळाली हे नाकारता येणार नाही. काँग्रेस पक्षाने उद्धव ठाकरे यांच्यावर कुरघोडी करण्याचा जो प्रयत्न केला त्यातून मुंबईत काँग्रेसची स्थिती ही पूर्वीपेक्षाही केविलवाणी झालेली आहे. मुंबईत एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला सर्वाधिक फटका बसला आहे. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या पन्नास टक्केदेखील कामगिरी त्यांना करता आलेली नाही. सन २०१७मध्ये निवडून आलेल्या उद्धव ठाकरेंच्या नगरसेवकांपैकी बहुतांश नगरसेवक फोडल्याने महापालिकेत उद्धव यांचा ङ्गटांगा पलटी घोडे फरार होणारफ हे त्यांचे आवडते भाकीत पूर्ण फसले. मात्र, मुंबई शहराशी अतूट नाते असलेल्या ठाणे शहरात शिंदे यांचा दबदबा कायम राहिलाच; शिवाय कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण व एकनाथ शिंदे यांचे पुत्र डॉ. श्रीकांत शिंदे यांच्यातील वैयक्तिक स्पर्धेतही शिंदे यांचे पारडे जड राहिले. त्यामुळे मुंबईत ठाकरे ब्रँडला नमवू न शकलेले शिंदे यांनी ठाण्यातील आपला गड राखला. पण अडीच वर्षे मुख्यमंत्री व आता वर्षभर उपमुख्यमंत्री असलेले शिंदे यांची प्रतिमा या निमित्ताने ङ्गठाण्याचे नेतेफ अशी झाली आहे. परिणामी महायुतीत देवेंद्र फडणवीस हेच सर्वांत शक्तिशाली नेते असल्याचे आपसूकच सिद्ध झाले आहे. आता पुढील दोन-तीन आठवड्यांत होणाऱ्या काही जिल्हा परिषदांच्या निवडणुका सोडल्या तर राज्यात २०२९पर्यंत कोणत्याही निवडणुका नाहीत. त्यामुळे भाजप हा महाराष्ट्रातील आजचा निर्विवादपणे सर्वांत शक्तिशाली पक्ष झाला असून त्यात देवेंद्र फडणवीस यांचा सिंहाचा वाटा आहे, हे मान्य करावेच लागेल. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठीचे धोरण, डावपेच, नियोजन या सगळ्या गोष्टी फडणवीस यांनीच एकहाती केल्या. मुंबईतील भाजपचे आशिष शेलार यांच्यासारख्या जाणत्या नेत्याऐवजी अमित साटम यांच्यासारख्या नव्या नेत्याच्या खांद्यावर धुरा देऊनही त्यांनी मुंबईत स्वतःच्या पक्षासोबत शिंदे यांच्या पक्षालाही आपल्या जनाधारास मतदान करायला लावले, हे त्यांचे सर्वांत मोठे यश आहे. महापालिकेचे निकाल लागल्याने गेले काही महिने एकमेकांवर सुरू असलेली चिखलफेक आता तरी थांबेल आणि मुंबई व आजूबाजूच्या परिसरात राहणाऱ्या नागरिकांच्या दररोजच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी हे सगळे पक्ष एकत्र येऊन काम करतील, अशी नेहमीसारखी वेडी आशा बाळगण्यास हरकत नाही. नागरी सुविधांची कामे करताना केवळ मोठे पायाभूत प्रकल्प म्हणजेच विकास असेच समजणे गरजेचे नाही, हे महापालिकेत सत्ताधारी म्हणून कौल मिळालेल्या



व विरोधी बाकांवर बसण्याचा आदेश जनतेने दिलेल्या पक्षांनी समजून घेण्याची गरज आहे. अटल सेतू वरळीपर्यंत नेणे, कोस्टल रोड विरारपर्यंत नेणे, मुंबईतील आठ मेट्रो वाहिन्या पूर्ण करणे हे त्यांचे ध्येय त्यांनी सोडावे असे नाही; मात्र मुंबईतील, सर्वसामान्य मध्यमवर्गीय, निम्न मध्यमवर्गीय, झोपडीधारकांसाठी आरोग्य सेवेत मोठ्या सुधारणाही कराव्या लागतील. पर्यावरणीय प्रश्न हे केवळ परिसंवादातून वक्तृत्व गाजवण्यासाठीच नसून ते सोडवले नाहीत, तर संपूर्ण मुंबई श्वसनरोगाने हैराण होते हे समजून अशा प्रश्नांना हात घालावा लागेल. मुख्य म्हणजे ही शहरे सर्वसामान्यांच्या बौद्धिक, शारीरिक मेहनतीतून वसलेली आहेत. त्याचा आदर करावा व भाषेवरून, धर्मावरून, सणवारांवरून, खाण्यापिण्यावरून कुठल्याही नागरिकांना त्रास देऊ नये, इतकीच महापालिकांची सत्ता मिळालेले कारभारी व विरोधी पक्षाची जबाबदारी मिळालेल्या पक्षांच्या नेत्यांकडून जनतेची माफक अपेक्षा आहे!




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पालिकांमध्ये भाजपची मुसंडी, विरोधकांना धडकी; 'गुजरात पॅटर्न'ला वेग येणार?

**सोलापूर :** राज्यातील २९ महापालिका निवडणुकांचे निकाल काल जाहीर झाले. यातील केवळ ५ महापालिकांमध्ये विरोधी पक्षांना बहुमत मिळालं आहे. अन्य २४ महापालिकांमध्ये महायुतीचे मित्रपक्षच सत्ताधारी असतील ही बाब स्पष्ट झाली आहे. भाजपनं धडाकेबाज कामगिरी करत जवळपास निम्म्या जागांवर आपले उमेदवार निवडून आणले आहेत. त्यानंतर आता विरोधी पक्षांना 'गुजरात पॅटर्न'ची भीती सतावू लागली आहे.गुजरातमध्ये भाजप जवळपास तीन दशकांपासून सत्तेत आहे. इतकी वर्षे सत्तेत राहिल्यावर अनेकदा सरकारविरोधात जनभावना तयार होते. त्याचा फटका सत्ताधाऱ्यांना बसतो आणि विरोधकांना संधी मिळते. पण अशी परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी गुजरात भाजपमध्ये एक प्रयोग करण्यात आला. त्यानंतर हा पॅटर्न तिथे सर्रासपणे राबवला गेला. विरोधकांना कमजोर करुन आपली ताकद वाढवण्याचे प्रयत्न पद्धतशीरपणे करण्यात आले. याचा फायदा भाजपला दिर्घकाळ सत्तेत राहण्यासाठी झाला.१९९५ पासून गुजरातमध्ये भाजपची सत्ता आहे. २०१४ पासून तर केंद्र आणि राज्यात भाजपचं सरकार आहे. या डबल इंजिनचा वापर करुन गुजरातमध्ये काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांचे पक्षप्रवेश घडवण्यात आले. स्थानिक पातळीवर मजबूत असलेले, पहिल्यांदा





विजयी झालेले, आधी भाजपनंच तिकीट नाकारलेले, सत्ता नसल्यानं अवस्थ झालेले नगरसेवक भाजपकडून हेरण्यात आले. राज्यात, केंद्रात सत्ता असल्यानं भाजपमध्ये आल्यास मतदारसंघातील विकासकामं वेगानं होतील, अशा पद्धतीची आश्वासनं त्यांना देण्यात आली. काँग्रेस काही सत्तेत येत नाही. त्यामुळे भविष्याचा विचार करुन काँग्रेसचे अनेक नगरसेवक भाजपनं आपल्याकडे वळवले.दोन तृतीयांश नगरसेवकांनी पक्षांतर केल्यास त्यांना पक्षांतर बंदी कायद्याचा अडथळा येत नाही. त्यामुळे घाऊक पक्षांतरं झाली. महापौर, नगराध्यक्षपदाच्या निवडणुकांच्या आधी अशी पक्षांतरं घडवली गेली. यामुळे अनेकदा सभागृहातील समीकरणं बिघडली. काँग्रेसकडून विजयी झाले आणि पुढच्या निवडणुकीच्या तोंडावर भाजपने आपल्याकडे खेचले, असे प्रकार सर्रास घडले. त्यामुळे भाजपला दुहेरी फायदा झाला. एका बाजूला भाजपला नवा चेहरा मिळाला. तर दुसरीकडे काँग्रेसकडे असलेला तुल्यबळ नेताच गेल्यानं त्यांची अवस्था बिकट झाली. उमेदवार निवडीसाठी त्यांनी बरीच शोधाशोध करावी लागली.

## शिंदेंच्या अशोक वैतीचा पराभव हा माझ्या मनाला लागला : आव्हाड





**ठाणे :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे 'शुभदिप' निवासस्थान असलेल्या ठाण्यातील प्रभाग क्रमांक : १३ मध्ये शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार शहाजी (गणेश) संपत खुस्पे यांनी या प्रभागातून पाच टर्म नगरसेवक राहिलेले शिवसेना उमेदवार तथा माजी महापौर अशोक वैती यांचा धक्कादायकरित्या पराभव केला. शिंदे यांच्या बालेकिल्ल्यामध्ये उबाठामधून नवखे उमेदवार असलेल्या खुस्पे यांनी वैती यांना धूळ चारल्याने सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत. खुस्पे यांना १२ हजार ८६०, तर वैती यांना १२ हजार १९३ मते मिळाली. अवघ्या ६६७ मतांनी या प्रभागात 'जायंट किलर' खुस्पे यांनी वैती यांच्यावर निसटता विजय मिळवला. अशोक वैती यांच्या पराभवावरुन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सरचिटणीस आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांनी ठाण्यात खंत व्यक्त केली. ठाणे पालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने (शप) १२ जागा व एक अपक्ष पुरस्कृत उमेदवार निवडून आणत तिसऱ्या क्रमांकावर मजल मारली. नवनिर्वाचित नगरसेवकांच्या सन्मान सोहळ्यानंतर आव्हाड यांनी पत्रकारांशी संवाद साधला.अशोक वैतीचा पराभव हा माझ्या मनाला लागणारा पराभव आहे. अशोक वैती सारखा चांगला नगरसेवक ठाणे महापालिकेत असणं ही नगर आहे. वेळप्रसंगी पक्षाच्या विरोधात जावून भूमिका घेऊन लोकांना मदत करणारा नगरसेवक म्हणून मी अशोकला ओळखतो. मी कित्येक वर्षांपासून अशोकला ओळखतो. अशोकचा पराभव हा मनाला लागणारा पराभव', अशी भावना जितेंद्र आव्हाड यांनी व्यक्त केली.

## घाटगे यांच्या भाजप प्रवेशावर चंद्रकात पाटील यांचं भाष्य

**कोल्हापूर :** महानगरपालिका निवडणुकीत महायुतीने भगवा फडकावल्यानंतर आता जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी जोरदार तयारी सुरू असताना समरजीत घाटगे यांची भाजप पक्षात घरवापसी झाली आहे. विशेष म्हणजे अधिकृत पक्षप्रवेशाआधीच रविवारी (१८ जानेवारी) कोल्हापूर येथे झालेल्या महायुतीच्या कोल्हापुरातील बैठकीत समरजीत घाटगे यांची प्रमुख उपस्थिती होती. राज्याचे तंत्र व उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी घाटगेंच्या पक्षप्रवेशाला शिक्कामोर्तब देत फक्त औपचारिकता बाकी असल्याचे जाहीर केले. तर समरजीत घाटगे यांच्या या पक्षप्रवेशाने कोल्हापूरच्या राजकारणातील समीकरणांमध्ये मोठे बदल होण्याची शक्यता आहे. कोल्हापुरातीलमहायुतीच्या या महत्त्वपूर्ण बैठकीत जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीची रणनीती ठरविण्यात आली. बैठकीस मंत्री चंद्रकांत पाटील, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह कोल्हापुरातील खासदार, आमदार आणि महायुतीचे व पदाधिकारी उपस्थित होते. समरजीत घाटगे यांची महायुती नेत्यांसोबत प्रमुख भूमिकेत उपस्थिती लाभली.

## दोन्ही राष्ट्रवादीत काहीतरी मोठं घडतंय, रोहित पवार अजित पवारांच्या भेटीला

**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या भेटीला गेले आहेत. राज्यात महापालिका निवडणुकांमध्ये दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांना एकत्र आल्यानंतरही हवं तसं यश मिळालेलं नाही. पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये अजित पवारांनी संपूर्ण ताकद पणाला लावली होती. पण तरिही तिथे अजित पवारांच्या पक्षाचा पराभव झाला. यानंतर आगामी काळात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत दोन्ही पक्षांना फटका बसू नये यासाठी दोन्ही पक्षांकडून खबरदारी घेतली जात असल्याची माहिती आहे. पुण्यातील बारामती हॉस्टेलमध्ये अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची बैठक पार पडत आहे. या बैठकीवेळी आमदार रोहित पवार त्यांच्या भेटीला गेले आहेत.अजित पवार हे आज सकाळपासून पुण्याच्या बारामती हॉस्टेलमध्ये आहेत. पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसोबत त्यांची बैठक पार पडत आहे. आगामी काळात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका आहेत. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसला चांगलं यश मिळावं यासाठी अजित पवार यांनी कंबर कसल्याचं बघायला मिळत



आहे. या दरम्यान रोहित पवार अजित पवारांच्या भेटीसाठी बारामती हॉस्टेल इथे दाखल झाले. अजित पवार आणि रोहित पवार यांनी दोन्ही नेत्यांची बैठक पार पडत असल्याची माहिती आहेमहापालिका निवडणुकीत पराभवाला सामोरं जावं लागल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासाठी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची निवडणूक ही प्रतिष्ठेची बनली आहे. दोन्ही राष्ट्रवादी ही निवडणूक एकत्र लढण्याच्या तयारीत आहेत. या बैठकीत आणखी एक महत्त्वाच्या विषयावर चर्चा होणार असल्याची माहिती आहे. दोन्ही पक्षांनी एकाच चिन्हावर निवडणूक लढवावी, अशी चर्चा या बैठकीत होण्याची शक्यता आहे. एकतर तुतारी किंवा घड्याळ चिन्हावर निवडणूक लढवावी, अशी चर्चा या बैठकीत होण्याची शक्यता आहे. घड्याळ चिन्हासाठी अजित पवार आग्रही असल्याची माहिती आहे. कारण

## एकनाथ शिंदेंचे २९ नगरसेवक 'ताज'मध्ये दाखल; शीतल म्हात्रेंनी सांगितलं कारण

**मुंबई :** मुंबई महापालिका निवडणुकीचे निकाल जाहीर झाले आहेत. यामध्ये महायुतीला बहुमत मिळालं आहे. महायुतीचा महापौर आता मुंबईमध्ये बसलेला पाहायला मिळाणार आहे. तत्पूर्वी महायुतीत मोठ्या नाट्यमय घडामोडी घडलेल्या पाहायला मिळत आहेत. निवडून आलेले शिंदे सेनेचे नवनियुक्त नगरसेवक मुंबईतल्या पंचतारांकीत हॉटेलात मुक्कामाला गेलेले आहेत. त्यांना तसे पक्षाचे आदेश असल्याची माहिती सुत्रांनी दिलेली आहे. पण यावरुन आता विविध तर्क वितर्क लावले जात आहेत. शिंदेंना मराठी आणि शिवसेनेचा महापौर मुंबईत हवा आहे, अडीच वर्ष महापौर पद शिवसेनेला हवं असाही एक कयास यामागे राजकीय जाणकार लावत आहेत. त्यामुळेचं शिंदेंनी ही खेळी खेळली आहे, असं सांगितलं जात आहे. परंतू आता महायुतीत महापौर





पदामुळे काही संघर्ष होणार आहे का हे येणाऱ्या काळात स्पष्ट होईलच, तत्पूर्वी शिंदेंच्या सेनेच्या नेत्या शीतल म्हात्रे यांनी शिंदे यांच्या सेनेचे नगरसेवक पंचतारांकीत हॉटेलात का मुक्कामाला आहेत. याचे उत्तर दिले आहे. त्यांनी आज माध्यमांशी संवाद साधला त्यावेळी त्यांनी या मुद्यावर भाष्य केलं आहे. त्या काय म्हणाल्या आहेत ते जाणून घेऊयात.आम्ही महायुती म्हणूनच इलेक्शनला समोर गेलेलो आहोत आणि महायुती म्हणून जिंकलेलो आहोत. आम्हाला जे मँडेट मिळालेले आहे ते महायुती म्हणून मिळालेले आहे. त्याच्यामुळे पाठीत खंजीर खूपसण्याची आमची भूमिका नाहीये. आम्ही महायुती म्हणूनच राज्यावर, मुंबई महानगरपालिकेवर येणार आहोत. हॉटेल पॉलिटिक्सबद्दल बोलायचं तर हे आमचे जे नगरसेवक आहेत ते जवळजवळ २९ नगरसेवकांपैकी जवळजवळ २० नगरसेवक हे पहिल्यांदा निवडून आलेले आहेत. त्याच्यामुळे त्यांना महानगरपालिकेच कामकाज कसं चालत याबद्दल काही माहिती नाही. तर त्या संदर्भात दोन दिवसांचं शिबिर आम्ही इथे ठेवलेलं आहे. जेणेकरून महानगरपालिकेमध्ये काम कसं चालतं, कामकाज कसं होतय, तिथले कायदे कानून काय आहेत, कशा पद्धतीने आपण सामोर जायचंय, याच्यासाठी आम्ही आज इथे नगरसेवकांना बोलावलेलं आहे. त्याच्यामुळे याच्याबद्दल जे काही हॉटेल पॉलिटिक्स वगैरे आम्हाला हे करायची गरज नाहीये. कारण आमचे जे निवडून आलेले हे वाघ आणि वाघीण आहेत. आणि हे उबाटाला हरवून आज इथे आलेले आहेत. त्याच्यामुळे ज्या काही पुड्या सोडतात, ते मला असं वाटतं की त्यांचेच नगरसेवक हे कुठे इकडे तिकडे जाऊ नये म्हणून तर हे करत नाहीयत ना असा संशय आम्हाला येतो आहे', असं शीतल म्हात्रेंनी यावेळी स्पष्ट केलं आहे.वरील प्रश्नावर बोलताना पुढे शीत म्हात्रे म्हणाल्या की, 'महायुती ही माननीय हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी केलेली ही नैसर्गिक महायुती आहे. त्याच्यामुळे बार्गेनिंग पॉवर्स वगैरे वाढवण्यासाठी आम्ही या गोष्टी करत नाही आहोत.

# कोल्हापुरात प्रसुतीनंतर डिस्चार्ज घेऊन घरी जाताना अपघात, बाळंतीणचा मृत्यू

**कोल्हापूर :** गडहिंग्लज-चंदगड राज्य मार्गावर कानडेवाडी येथे झालेल्या भीषण अपघातानंतर नेसरी पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक आबा गाढवे यांची कोल्हापूर पोलिस अधीक्षकांनी तडकाफडकी बदली केली आहे. बाळंतपणानंतर घरी जाणाऱ्या सुवर्णा राहुल कुंदेकर (वय २९, रा. अडकूर, ता. चंदगड) यांचा या अपघातात मृत्यू झाला. त्यानंतर ग्रामस्थांनी पोलिसांवर संशयित चालकाला संरक्षण दिल्याचा आरोप करत आक्रमक आंदोलन केले. या तणावपूर्ण प्रसंगाने उफाळलेल्या संतापामुळे पोलिस प्रशासनाने घाईघाईने कारवाई करत गाढवे यांची पोलीस कंट्रोल रूमला रवानगी केली.गुरुवारी दुपारी नेसरीहून अडकूरकडे जाणाऱ्या राहुल कुंदेकर (वय ३२) यांच्या मोटारीला (एमएच ०४ डीएम ३७४९) चंदगडहून





नेसरीकडे येणाऱ्या स्वप्निल रानगे (राहणार चंदगड) यांच्या मोटारीने (एमएच ०९ जीए ७५१५) समोरासमोर धडक दिली. रानगे हे चंदगड नगरपंचायतीतील कर निर्धारण अधिकारी आहेत. या धडकेत सुवर्णा यांच्यासह त्यांचा सात दिवसांचा नवजात बाळ, दोन वर्षांचा रुद्र आणि आरती भाबर (वय ६०, रा. हलकर्णी) असे चार जण जखमी झाले. सुवर्णा यांचा कोल्हापूर रुग्णालयात मृत्यू झाला, तर इतरांची गडहिंग्लजमधील दवाखान्यांत प्रकृती स्थिर आहे. ग्रामस्थांच्या मते, अपघातानंतर नेसरी पोलिसांनी संशयित रानगे याला तात्काळ अटक न करता संरक्षण दिले. यामुळे हजारो अडकूरकरांनी मृतदेह पोलिस ठाण्यासमोर ठेवून मोर्चा काढला आणि एका गाडीला आग लावली.अपघातानंतर माजी उपनगराध्यक्ष महेश कोरी आणि संग्राम कुपेकर यांनी जखमींना वाहनातून बाहेर काढून १०८ रुग्णवाहिका बोलावली. मात्र, पोलिसांची कारवाई रखडल्याने ग्रामस्थांनी 'रानगे हजर करा, गाढवे निलंबित करा' अशा घोषणा देत पोलिस ठाण्यावर मोर्चा काढला. गडहिंग्लज उपविभागीय पोलिस अधिकारी रामदास इंगवले आणि चंदगड पीआय विश्वास पाटील यांनी पोलिस बळ सतर्क केले.संकटकाळात आमदार शिवाजी पाटील यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी गाढवे यांच्यावर कारवाई आणि रानगे याला गडहिंग्लज कोर्टात हजर करण्याची हमी दिली. यानंतर ग्रामस्थ शांत झाले आणि अडकूर येथे सुवर्णा यांच्यावर अंत्यसंस्कार झाले. कोल्हापूर पोलीस अधीक्षक योगेश कुमार गुप्ता यांनी तात्काळ गाढवे यांची बदली करून प्रकरण शांत केले.नेसरी पोलिसांकडून अपघाताची नोंद करण्यात आली असून, रानगे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्हा पोलिस प्रशासनाने वाहनचालकांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले आहे. तर 'या अपघाताची आम्ही अधिक चौकशी करत असून आरोपीला शिक्षा नक्कीच मिळेल, नागरिकांनी थोडा संयम बाळगावा.' अशी प्रतिक्रिया पोलीस अधीक्षक योगेश कुमार गुप्ता यांनी दिली आहे.

दरम्यान, या प्रकरणाने स्थानिक राज्यमार्गावरील सुरक्षा आणि पोलिस कारवाईची निष्पक्षता यांच्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. मात्र, या प्रकरणी तपासात नेमक्या कोणकोणत्या गोष्टी समोर येतात, हे देखील पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

## ट्रकने दुचाकीला उडवलं, देवदर्शनाला जाताना तरुणाचा करुण अंत

**बीड :** माजलगाव-गढी महामार्गावर एका भीषण अपघाताने परिसर हादरून गेला आहे. जातेगाव फाट्याजवळ उसाने भरलेल्या ट्रकने दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली. या हृदयद्रावक घटनेत एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला आहे. तर, त्याचा सोबती गंभीर जखमी झाला असल्याची माहिती आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरातून एकच हळहळ व्यक्त केली जात आहे.बीड जिल्ह्यातील पेंडगाव येथे अमावास्येनिमित्त देवदर्शनाचे मोठे महत्त्व असते. याच श्रद्धाभावातून मंगरूळ क्रमांक २ येथील अमर पंडितराव बापमारे (वय वर्ष २६) आणि नाना उद्धव बापमारे हे दोन तरुण शनिवारी दुपारी १२ च्या सुमारास दुचाकीवरून देवदर्शनासाठी निघाले होते. माजलगावकडून गढीच्या दिशेने जात असताना, जातेगाव फाटा परिसरात त्यांच्या दुचाकीला पाठीमागून येणाऱ्या उसाच्या ट्रकने (क्र. एमएच ११ एएल ०५१८) भीषण धडक दिली. हा अपघात एवढा भीषण होती की, दुचाकीचालक अमर बापमारे याचा जागीच मृत्यू झाला आहे. ऐन विशीतल्या तरुणाचा असा दुर्दैवी अंत झाल्याने बापमारे



कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या अपघातात दुसरा तरुण, नाना बापमारे हा गंभीर जखमी झाला असून त्याचा पाय फॅक्चर झाला आहे. त्याला तातडीने जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तातडीने धाव घेत मदतकार्य केले आणि तलवाडा पोलिस ठाण्याला माहिती दिली. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला आणि वाहतूक सुरळीत केली आहे. या प्रकरणी पोलिसांनी ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली असून, तलवाडा पोलिस पुढील तपास करत आहेत. रस्त्यावरील अवजड वाहनांची वर्दळ आणि वेगमर्यादेचे उल्लंघन यामुळे अशा घटना वारंवार घडत असल्याचे बोलले जात आहे.

## खंडणीखोर टोळीचा पोलिसांकडून पर्दाफाश..



**अहिल्यानगर :** सोशल मीडियाच्या आड लपून प्रायव्हेट फोटो व्हायरल करण्याची धमकी, जीवावर उठणारे मेसेज आणि तब्बल २० लाख रुपयांची खंडणी मागणाऱ्या श्रीगोंदा पोलिसांनी खंडणीखोर टोळीचा कणा मोडून काढला आहे. तीन सराईत आरोपींना गजाआड करत पोलिसांनी ५४ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, आरोपी सध्या पोलीस कोठडीत आहेत.१ जानेवारीपासून फिर्यादी वैभव आसाराम खेंडके (वय २७, रा. श्रीगोंदा) यांना अज्ञात मोबाईल क्रमांकावरून व्हॉट्सअ‍ॅपवर धमकीचे मेसेज येऊ लागले. तुझे खासगी फोटो व्हायरल करू अशी भीती दाखवत आरोपींनी २० लाखांची खंडणी मागितली. घाबरलेल्या वैभव यांनी सुरुवातीला १ लाख ५० हजार रुपये दिले. मात्र एवढ्यावर न थांबता आरोपींनी आता तुला किंवा तुझ्या घरच्यांना जिवंत सोडणार नाही अशी जिव्हारी लागणारी धमकी दिली.प्रकरणाचे गांभीर्य ओळखून श्रीगोंदा पोलिसांनी वेळ न दवडता मोहीम उघडली. पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक तयार करण्यात आली. सायबर सेलच्या मदतीने मोबाईल ट्रेसिंग करत खंडणीखोरांच्या मुसक्या आवळण्यात आल्या. चौकशीत आकाश पोपट मोरे, बापू विठ्ठल शिंदे आणि किरण विठ्ठल शिंदे हे तिघे मुख्य आरोपी निष्पन्न झाले.दरम्यान, या कारवाईत पोलिसांनी आरोपींकडून गुन्ह्यासाठी वापरलेले ३ मोबाईल फोन आणि ३ आलिशान चारचाकी वाहने जप्त केली आहेत याशिवाय एकूण मुद्देमालाची किंमत ५४.८० लाख रुपये इतकी आहे. तपासात आणखी धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता असून टोळीचा पसारा मोठा असल्याचे संकेत पोलिसांनी दिले आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी प्रवीणचंद्र लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. श्रीगोंदा पोलीस आणि सायबर सेलच्या पथकाने दाखवलेली तत्परता सध्या सर्वत्र चर्चेचा विषय ठरत आहे.

## व्यापाऱ्यांचे धाबे दणाणले, नागपुरात एकाच वेळी आयटीचे २० ठिकाणी छापे

**नागपूर :** नागपूर शहरात महापालिका निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होताच शनिवारी सकाळी आयकर विभागाने नागपुरातील सुपारी व्यापाऱ्यांवर मोठी कारवाई करत खळबळ उडवून दिली. आयकर विभागाच्या पथकाने शहरातील २० पेक्षा अधिक ठिकाणी एकाचवेळी छापे टाकत तपास सुरू केला आहे. ही कारवाई प्रामुख्याने सुपारी व्यापाराशी संबंधित व्यापारी, त्यांचे गोदाम, कार्यालये तसेच काही ट्रान्सपोर्ट व्यावसायिकांवर करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सुपारीच्या कथित बेकायदेशीर व्यापारात वारंवार चर्चेत आलेले राजू अण्णा उर्फ राजेश शिनॉय, अलताफ कलीवाला, आसिफ





कलीवाला, गनी कलीवाला यांच्यासह काही ट्रान्सपोर्टर्स आयकर विभागाच्या रडारवर आले आहेत. मुंबईतील सुपारी व्यापारी फारूक भाई यांच्याशी असलेल्या कथित आर्थिक व्यवहार आणि कनेक्शनमुळे नागपुरातील या व्यापाऱ्यांवर ही धडक कारवाई झाल्याची चर्चा आहे.शनिवारी पहाटेपासून आयकर विभागाची मोठी टीम शहरात सक्रिय झाली. शांतिनगर आणि कामठी रोड येथील राजू अण्णा यांच्या निवासस्थानावर झडती सुरू असून, कलीवाला बंधूंच्या कार्यालये व गोदामांचीही सखोल तपासणी करण्यात येत आहे. याशिवाय गनी कलीवाला यांच्या कार्यालय-गोदामावरही छापा टाकण्यात आला आहे. कळमना परिसर आणि मां उमिया इंडस्ट्रियल एरिया येथे असलेल्या सुपारी व्यापाऱ्यांच्या गोदामांमध्येही तपास सुरू आहे.जागनाथ बुधवारी आणि इतवारी परिसरातील सुपारी व्यापाराशी संबंधित दुकानांवर आयकर विभागाचे पथक पोहोचल्याने व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. या कारवाईदरम्यान कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. एके-४७ शस्त्रांनी सज्ज सुरक्षा जवान, तसेच डॉग स्कॉडच्या उपस्थितीमुळे परिसरात तणावपूर्ण शांतता दिसून आली. नागपूर हे मध्य भारतातील सुपारी व्यापाराचे मोठे केंद्र मानले जाते. येथून संपूर्ण मध्य भारतात सुपारीचा पुरवठा होतो. विशेषतः सडलेल्या सुपारीचा मोठ्या प्रमाणावर वापर तंबाखू, मावा आणि गुटखा निर्मितीसाठी होत असल्याचे सांगितले जाते. आयकर विभागाला संशय आहे की या व्यापारातून मोठ्या प्रमाणावर करचुकवेगिरी करण्यात आली असून, काळ्या पैशाचा व्यवहार देशभर पसरलेला असू शकतो. छाप्यांमध्ये नेमके काय हाती लागले याबाबत आयकर विभागाचे अधिकारी सध्या कोणतीही अधिकृत माहिती देण्यास तयार नाहीत.

# टीम इंडियाचा इंदूर वनडेमध्ये दारूण पराभव, न्यूझीलंडने रचला इतिहास

## विराट कोहलीचं शतक व्यर्थ; न्यूझीलंडने एकदिवसीय मालिका २-१ ने जिंकली..



**नवी मुंबई :** भारत आणि न्यूझीलंडमध्ये झालेल्या तीन सामन्याच्या एकदिवशी मालिकेतील तिसऱ्या सामन्यात टीम इंडिया दारूण पराभव झालाय. हा सामना इंदूरच्या होळकर क्रिकेट स्टेडियमवर झाला. या अखेरच्या सामन्यात भारताचा ४१ धावांनी पराभव झाला. न्यूझीलंडच्या संघाने भारतासमोर ३३८ धावांचे लक्ष्य ठेवलं होतं.

या आव्हानाचा पाठलाग करताना भारताचा डाव ४६ षटकांत २९६ धावांवर आटोपला. या विजयासह न्यूझीलंडने एकदिवसीय मालिका २-१ ने जिंकली आहे. न्युझीलंचा हा विजय भारतातील पहिलाच एकदिवसीय मालिकेतील विजय आहे. न्युझीलंडने दिलेलं आव्हान पार करताना विराट कोहलीनं धमकेदार शतक केल. मात्र त्याचे फटकेबाजी व्यर्थ ठरली.

एकदिवसीय मालिकेचा पहिला सामना वडोदरा येथे खेळला गेला तेथे भारतीय संघाने चार विकेट्सने विजय मिळवला होता. त्यानंतर किवीच्या संघाने राजकोट एकदिवसीय सामन्यात सात विकेट्सने विजय मिळवत मालिका १-१ अशी बरोबरीत आणली. त्यानंतर तिसऱ्या सामन्यात भारताला पराभूत करत मालिका आपल्या खिश्यात घातली.

धावांचा पाठलाग करताना भारतीय संघाची सुरुवात खराब झाली. रोहित शर्माला झाचेरी फौल्क्सने ११ धावांवर बाद केले. तर फॉर्ममध्ये असलेला कर्णधार शुभमन गिलही अवघ्या २३ धावांवर बाद झाला. त्याला काइल जेमिसनने त्रिफळाचित केलं. त्यानंतर श्रेयस अय्यरला ख्रिश्चन क्लार्कने फक्त ३ धावांवर बाद केलं. इतकेच नाही तर गेल्या सामन्यात शतक ठोकणारा केएल राहुल इंदूरमध्ये अपयशी ठरला. फिरकी गोलंदाज जेडेन लेनोक्सने त्याला १ धावेवर बाद केलं. राहुल बाद झाला तेव्हा भारताची धावसंख्या



७१/४ होती. चार विकेट गमावल्यानंतर, विराट कोहली आणि नितीश कुमार रेड्डी यांनी पाचव्या विकेटसाठी ८८ धावांची भागीदारी केली. कोहलीने ५१ चेंडूत चार चौकार आणि एक षटकार मारत आपले अर्धशतक पूर्ण केलं. दरम्यान, नितीश कुमारनेही ५२ चेंडूत अर्धशतक पूर्ण केलं, पण अर्धशतक केल्यानंतर तो जास्त वेळ क्रिझवर राहू शकला नाही. त्याने ५७ चेंडूत दोन षटकार आणि दोन चौकारांसह ५३ धावा केल्या. जडेजाकडून मोठी खेळी अपेक्षित होती, परंतु तो फक्त १२ धावा करून बाद झाला.

त्यानंतर विराट कोहली आणि हर्षित राणा यांनी सातव्या विकेटसाठी ९९ धावांची भागीदारी केली. या भागीदारीदरम्यान कोहलीने ९१ चेंडूत आठ चौकार आणि दोन षटकार मारत आपले शतक पूर्ण केलं. हे कोहलीचे ५४ वे एकदिवसीय शतक आणि एकूण ८५ वे आंतरराष्ट्रीय शतक होते. हर्षित राणाने चार षटकार आणि चार चौकारांच्या मदतीने आपले अर्धशतक पूर्ण केले, परंतु अर्धशतक पूर्ण केल्यानंतर तो लगेचच बाद झाला. त्यानंतर पुढच्याच चेंडूवर भारताने मोहम्मद सिराजला बाद झाला.

# सूर्यकुमार आरोप करणं महागात; १०० कोटींचा मानहानीचा दावा

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट टीमचा टी-२० कर्णधार सूर्यकुमार यादव याच्याबद्दल बॉलिवूड अभिनेत्रीने एक वक्तव्य केलं होतं. दरम्यान सूर्यकुमारवर केलेल्या विधानामुळे अभिनेत्री खुशी मुखर्जी अडचणीत आल्याचं दिसून येतंय. तिची मुलाखत सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर हे प्रकरण आता कायदेशीर लढाईत पोहोचलंय. सोशल मीडिया इन्फ्लुएंसर फैजान अन्सारी यांनी खुशी मुखर्जी यांच्याविरुद्ध १०० कोटी रुपयांचा मानहानीचा दावा दाखल केलाय.






खुशी मुखर्जीने एका मुलाखती दरम्यान सूर्यकुमार यादव तिला वारंवार मेसेज करत असल्याचा दावा केला होता. त्यानंतर हे संपूर्ण प्रकरण समोर आलं होतं. या विधानावरून सोशल मीडियावर खळबळ उडाली होती. दरम्यान यावर क्रिकेटच्या चाहत्यांनीही प्रतिक्रिया दिली होती. मुंबईतील रहिवासी फैजान अन्सारी यांनी गाझीपूर पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली आहे. खुशी मुखर्जीचे आरोप पूर्णपणे निराधार आहेत आणि त्यामुळे आंतरराष्ट्रीय खेळाडूचं प्रतिमा मलिन झाली आहे, असं अन्सारी यांचं म्हणणं आहे. त्यांनी असा दावा केला आहे की, अशी विधानं केवळ प्रसिद्धीसाठी केली जात होती. अन्सारी यांनी सांगितलं की, तक्रार दाखल करण्यासाठी ते स्वतः मुंबईहून गाजीपूरला गेले होते. असे आरोप खेळाडूच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक इमेजवर परिणाम करतात आणि कोणत्याही परिस्थितीत असं करणं योग्य नाही. माध्यमांशी बोलताना फैजान अन्सारी म्हणाले की, या प्रकरणात कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. खुशी मुखर्जीविरुद्ध गंभीर कलमांखाली एफआयआर दाखल केला पाहिजे. हा केवळ सूर्यकुमार यादवच्या प्रतिष्ठेचा प्रश्न नाही तर देशभरातील एका प्रतिष्ठित खेळाडूचा आहे. फैजान अन्सारी यांनी स्पष्ट केलं की, त्यांनी खुशी मुखर्जीविरोधात १०० कोटी रुपयांचा मानहानीचा दावा दाखल केलाय. त्यांनी असंही म्हटलंय की, जर खुशी मुखर्जीने तिचे दावे पुराव्यांसह सिद्ध केले तर ते सार्वजनिकरित्या माफी मागण्यास तयार आहेत.

# इथिओपियाच्या धावपटूंचे वर्चस्व

**मुंबई :** प्रतिष्ठेच्या मुंबई मॅरेथॉनमध्ये इथिओपियाच्या धावपटूंना आपले वर्चस्व राखण्यात यश आले. इथिओपियाच्या धावपटूंनी 'एलिट' पुरुष आणि महिला या दोनही गटांमध्ये अव्वल स्थान मिळवले. पुरुषांमध्ये ताडू अबाते डेमेने जेतेपद राखले. तर, महिलांमध्ये येशी चेकोले हिने अजिंक्यपद मिळवले. पुरुष गटात अव्वल दहा धावपटूंपैकी पाच हे इथिओपिया, दोन केनिया, एक इरिट्रिया, एक युगांडा आणि एक भारताचे होते. महिलांमध्ये मात्र इथिओपियाने पूर्णपणे वर्चस्व राखले. अव्वल आठही धावपटू इथिओपियाच्या होत्या.

रविवारी झालेल्या मुंबई मॅरेथॉनमधील सर्वांत प्रतिष्ठेची मानली जाणारी पूर्ण मॅरेथॉन स्पर्धा ताडू अबाते डेमेने जिंकली. डेमेने ४२.१९५ किलोमीटरचे अंतर २ तास ०९ मिनिटे आणि ५५ सेकंद अशा वेळेसह पूर्ण करत 'एलिट' पुरुष गटात अग्रस्थान मिळवले. महिलांमध्ये चेकोलेने २ तास २५ मिनिटे आणि १३ सेकंद अशा वेळेची नोंद करत जेतेपद मिळवले.

'एलिट' गटात पुरुषांमध्ये केनियाचा लेओनार्ड लंगाट (२ तास १० मिनिटे १० सेकंद) दुसऱ्या, तर इरिट्रियाचा मेरहावी केसेटे (२ तास १० मिनिटे २२ सेकंद) तिसऱ्या स्थानावर आले. महिलांमध्ये किडसन अलेमा (२ तास २७ मिनिटे ३५ सेकंद) आणि गोजाम एनयेव (२ तास २८ मिनिटे २७ सेकंद) यांनी अनुक्रमे दुसरे आणि तिसरे स्थान पटकावले. पुरुषांमध्ये



अव्वल तीनही धावपटूंनी ३० किमीचे अंतर १ तास ३१ मिनिटे २९ सेकंदांत पूर्ण केले होते. मात्र, अखेरच्या काही किलोमीटरमध्ये डेमेने आपला वेग वाढवला आणि अजिंक्यपद पटकावले.

गौरव माथूर, रमेश गवळी आणि तन्मय पवार यांनी अर्धमॅरेथॉनमध्ये अव्वल तीन स्थान पटकावले. महिलांमध्ये रीनू, प्रियांका सी व एकता यांनी चमकदार कामगिरी केली. गौरव माथूरने चमक दाखवताना १ तास ०७ मिनिटे १८ सेकंद वेळेसह अव्वल स्थान पटकावले. रमेशने १ तास ११ मिनिटे ३२ सेकंद तर, तन्मय १ तास १२ मिनिटे २७ सेकंद वेळेची नोंद केली. महिलांमध्ये रीनूने १ तास १८ मिनिटे ०२ सेकंद वेळेची नोंद करताना अव्वल स्थान मिळवले. तर, प्रियांका १ तास १९ मिनिटे १३ सेकंदांसह दुसऱ्या आणि एकता १ तास २३ मिनिटे १९ सेकंद वेळेसह तिसऱ्या स्थानी राहिली.

# शाहरुखने वाढदिवशी चाहत्यांना खास ट्रीट, KING चा लूक समोर

**मुंबई :** आज शाहरुख खान त्याचा ६० वा वाढदिवस साजरा करत आहे. त्यामुळे त्याच्या चाहत्यांमध्ये सुद्धा आनंदाचे वातावरण पाहायला मिळते. काल रात्रीपासूनच त्याच्या घराबाहेर चाहत्यांनी गर्दी केली आहे. त्यामुळे पोलीस सुद्धा कडेकोट बंदोबस्त देत आहे. अशातच शाहरुख खानने त्याच्या चाहत्यांना बर्थडेचं खास गिफ्ट दिलं आहे.

शाहरुख खानच्या वाढदिवसानिमित्त, त्याच्या आगामी चित्रपट 'किंग' चा धमाकेदार लूक समोर आला आहे. दिग्दर्शक सिद्धार्थ आनंद यांनी रिलीज व्हिडिओ शेअर केला आहे, ज्यामध्ये शाहरुख पूर्णपणे वेगळ्या लूकमध्ये दिसत आहे. 'पठाण' नंतर हा सिद्धार्थ आनंदसोबतचा दुसरा दुसरा चित्रपट आहे.

शाहरुख खानने 'किंग' चा व्हिडिओ सोशल मीडियावर पोस्ट केला आणि कॅप्शनमध्ये लिहिले, '१०० देशांमध्ये कुप्रसिद्ध, जगाने त्याला फक्त एकच नाव दिले आहे- किंग, आता शोची वेळ आली आहे. २०२६ मध्ये थिएटरमध्ये.' या व्हिडिओमध्ये, आपण तो माणूस पाहतो ज्याला सर्वजण किंग खान म्हणतात, आता तो त्याच नावाच्या भूमिकेत पाहायला मिळणार आहे, आणि तेही एका शक्तिशाली आणि दमदार रुपात. एक पात्र ज्याच्या नावाने केवळ भीतीच नाही तर दहशतही निर्माण होते जेव्हा तो म्हणतो, 'सौ देशों में बदनाम, दुनिया ने दिया सिर्फ एकही नाम किंग'. २ नोव्हेंबर हा दिवस जगभरात 'शाहरुख दिन' म्हणून साजरा केला जातो आणि यावर्षी तो आणखी खास आहे. शाहरुख खानच्या वाढदिवशी, दिग्दर्शक सिद्धार्थ आनंदने त्याच्या बहुप्रतिक्षित चित्रपट 'किंग' चा टायटल रिलीज व्हिडिओ शेअर केला आहे. हा चित्रपट २०२६ मध्ये प्रदर्शित होईल. या चित्रपटात शाहरुख खानची अशी बाजू दाखवण्यात येईल जी प्रेक्षकांनी यापूर्वी कधीही पाहिली नसेल.

चाहत्यांनी पाहिले की शाहरुख खानने किंगचे पत्त्याचे पान तोंडात धरले आहे. हे त्याच्या खऱ्या नावाप्रमाणे म्हणजेच किंग ऑफ हार्ट्स, पडद्यावर असो वा खऱ्या आयुष्यात, एक संकेतस्वरुपी आहे. त्याचा नवीन सिल्व्हर हेअर लूक, कानातले आणि स्टाईल यापूर्वी कधीही पाहिलेला नाही असा पूर्णपणे नवीन आणि वेगळा अंदाय या सिनेमात पाहायला मिळण्याची शक्यता आहे.




## फौजी चित्रपटात सुपरस्टार प्रभास

**मुंबई :** सुपरस्टार प्रभास याच्या नव्या चित्रपटाचे नाव आणि पोस्टर प्रदर्शित करण्यात आले आहे. हनु राघवपुडी यांच्याकडून दिग्दर्शित या चित्रपटाचे नाव फौजी आहे. याच्या पोस्टरवर जबरदस्त ॲक्शन ड्रामाची झलक आहे, तसेच भगवद्गीतेतील काही ओळींचा उल्लेख असून त्याचा अर्थ महाभारतातील कर्ण आणि पांडवाशी निगडित आहे. 'जो जन्मापासूनच योद्धा आहे, तो गुरुशिवाय एकटा आहे' असा याचा आशय आहे. आमच्या इतिहासाच्या लपलेल्या अध्यायांपैकी एका सैनिकाची सर्वात शूर कहाणी असे या पोस्टच्या कॅप्शनदाखल म्हटले गेले आहे. प्रभास आणि राघवपुडी यांचा हा चित्रपट स्वातंत्र्यपूर्वीच्या भारतातील कहाणी दर्शविणारा आहे. हा एक देशभक्तीने युक्त वॉरड्रामा असेल, ज्यात प्रभास चित्रपटाच्या नावानुरुप एका सैनिकाच्या भूमिकेत असेल. त्याची ही भूमिका स्वातंत्र्य आणि सन्मानासाठी लढणाऱ्या एका बटालियनचे नेतृत्व करणारी असेल. चित्रपट वीरता, बलिदान आणि योद्ध्यांच्या भावनेला मोठ्या पडद्यावर साकार करणार आहे. फौजी चित्रपटात इमानवी इस्माइल हे खलनायकाच्या भूमिकेत असतील. याचबरोबर अनुपम खेर, मिथुन चक्रवर्ती आणि जया प्रदा देखील यात दिसून येणार आहेत.



## अनोख्या विषयावर काम्याचा चित्रपट

**मुंबई :** डिजिफिल्मिंग आणि मिररो फिल्म्सने 'मी नो पॉज मी प्ले' या चित्रपटाचे पोस्टर शेअर केले आहे. मेनोपॉजवर आधारित हा भारताचा पहिला फिचर फिल्म ठरणार आहे. याचबरोबर सामाजिक जागरुकतेकरता एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे. महिलांचे आरोग्य, भावनात्मक बदल आणि आत्मस्वीकृतीविषयी चर्चेला साम ान्य स्वरुप देणे हा या चित्रपटाम ागील उद्देश आहे. लेखक आणि निर्माते मनोज कुमार शर्मा यांच्या पुस्तकावर आधारित चित्रपट 'मी नो पॉज मी प्ले' एक अशा विषयावर मौन सोडतो, जो बऱ्याचअंशी दुर्लक्षिण्यात आलेला आहे आणि जीवनाच्या या स्वाभाविक टप्प्यादरम्यान महिलांचे आरोग्य, भावना आणि ओळखीवर प्रकाश टाकतो. हा चित्रपट २८ नोव्हेंबर रोजी प्रदर्शित होईल. हा चित्रपट मेनोपॉजच्या अवघड काळातून जाणाऱ्या महिलांच्या प्रामाणिक अनुभवांना समोर आणण्यासोबत त्यांचे साहस, आत्मनिरीक्षण आणि आत्मशोधाची भावपूर्ण कहाणी मांडणार आहे. चित्रपटात काम्या पंजाबी मुख्य भुमिका साकारत आहे. तिच्यासोबत दीपशिखा नागपाल, मनोज कुमार शर्मा, सुधा चंद्रन, एमी मिसोब्बा आणि अमन वर्मा देखील महत्त्वाची भूमिका साकारत आहे. हे सर्व कलाकार नारीत्व आणि आत्मस्वीकृतीच्या यात्रेच्या विविध दृष्टीकोनांना पडद्यावर साकार करण्याचा प्रयत्न करणार आहेत.



## 'थामाच्या यशानंतर रश्मिकाची दीपिकासोबत होतेय तुलना

**मुंबई :** 'थामा' चित्रपटाचे दिग्दर्शक आदित्य सरपोतदार सध्या आयुष्मान खुराना आणि रश्मिका मंदाना यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या चित्रपटाच्या यशाचा आनंद साजरा करत आहेत. दिवाळीला प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाला प्रेक्षकांकडून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. अशातच आता नुकत्याच एका मुलाखतीमध्ये आदित्य सरपोतदार यांनी कलाकारांच्या कामाच्या वेळेबद्दल भाष्य केलं आहे.

एका मुलाखतीमध्ये आदित्य सरपोतदार म्हणाले की, निश्चित कामाचे तास आवश्यक आहेत. कधीकधी असं गृहीत धरलं जातं की, प्रत्येकजण २४ तास काम करेल, ज्यामुळे शारीरिक आणि मानसिक थकवा येतो. दिग्दर्शकाच्या मते, शूटिंग दरम्यान १२ तासांची शिफ्ट योग्य आहे, परंतु त्यापेक्षा जास्त काम करणं योग्य नाही. त्यांनी असंही म्हटलं की, कधीकधी लोकांना शूटिंगदरम्यान घरी जाण्याची संधीही मिळत नाही आणि पूर्णपणे चूकीचं आहे. आदित्य सरपोतदार यांनी दीपिका पदुकोणच्या कामाच्या वेळेच्या निश्चित मागणीबद्दल बोलताना सांगितलं की, अशा विनंत्यांमागील कारण समजून घेणं महत्त्वाचं आहे. कलाकारांना कॅमेऱ्यासमोर एक विशिष्ट लूक ठेवावा लागतो, म्हणून तिच्या मागण्यांमागील विचारांचा विचार केला पाहिजे. आदित्य सरपोतदार म्हणाले, 'एक अभिनेता म्हणून, तुम्हाला कॅमेऱ्यासमोर एका विशिष्ट पद्धतीनं दिसावं लागतं. म्हणून, जेव्हा दीपिकाने ८ तासांच्या कामाच्या मर्यादेचा मुद्दा उपस्थित केला तेव्हा आपण त्यामागील कारण समजून घेतलं पाहिजे. कोणीही विनाकारण मागणी करत नाही, म्हणून हे समजून घेणं महत्त्वाचं आहे.' त्यांनी पुढे म्हटलं की, ही पूर्णपणे वैयक्तिक निवड आहे आणि त्यांच्या कलाकारांच्या आरामाची खात्री करणं ही दिग्दर्शकाची जबाबदारी आहे.



रश्मिका मंदानाबद्दल आदित्य म्हणाले, 'रश्मिका १२ तास काम करते, पण ती कधीही तक्रार करत नाही. कदाचित ती तिच्या करिअरच्या अशा टप्प्यावर आहे, जिथे ती हे करू शकते, पण हे सर्वांना लागू होत नाही. माझं असं मत आहे की, अभिनेते आणि दिग्दर्शक एकाच विचारसरणीचे असतील तरच त्यांनी एकत्र काम करावं.'

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# परदेश दौ-यावर जाणा-या शेतकऱ्यांच्या पहिल्या गटाला कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिल्या शुभेच्छा

**जनसंचलन/ बुलढाणा**

कृषी विभागाच्या वतीने शेतकऱ्यांची ज्ञानवृद्धी व आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने ङ्कशेतकरी परदेश अभ्यास दौरा योजनाफ्फ्रमधील रवाना झालेल्या शेतक-यांना कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून संवाद साधून शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांनी परदेशातील आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा अभ्यास करून तो अनुभव राज्यातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावा, असे आवाहन केले. शेतकरी परदेश अभ्यास दौरा योजनाफ्फ्रअंतर्गत २०२५-२६ या वर्षात तीन अभ्यास दौरे नियोजित आहेत. त्यामध्ये युरोप, इस्राईल आणि मलेशिया,व्हिएतनाम, फिलिपाईन्स या देशांचा समावेश आहे. या योजनेअंतर्गत १७ जानेवारी २०२६ रोजी मलेशिया, व्हिएतनाम व फिलिपाईन्स या तीन देशांचा एकत्रित अभ्यासदौरा आयोजित केला आहे. या दौऱ्यातील सहभागी शेतकऱ्यांनी पुणे येथून मुंबई मार्गे पुढे प्रस्थान केले असून, या दौऱ्यामध्ये राज्यातील १५ प्रगतशील शेतकरी, १ कृषी विभाग अधिकारी तसेच १ प्रवासी कंपनी प्रतिनिधी हे सहभागी झाले आहेत. या अभ्यास दौऱ्यामध्ये सहभागी शेतकऱ्यांना आधुनिक शेती पद्धती, संरक्षित शेती, कृषी प्रक्रिया उद्योग, निर्यातक्षम उत्पादन तंत्रज्ञान, तसेच विविध देशांतील कृषी व्यवस्थापन व विपणन व्यवस्था यांचा प्रत्यक्ष अभ्यास करण्याची संधी मिळणार आहे. या अनुभवाचा उपयोग करून राज्यातील शेती अधिक उत्पादनक्षम व शाश्वत करण्यास मदत होणार आहे.विशेष बाब म्हणजे, २०१९ नंतर आयोजित करण्यात आलेला हा पहिलाच परदेश अभ्यास दौरा असून कृषी विभागाने पुन्हा एकदा ही महत्वाकांक्षी योजना प्रभावीपणे राबविण्यास सुरुवात केली आहे. कृषी विभागाच्या या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील शेती तंत्रज्ञानाची माहिती मिळून राज्यातील शेती विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास विभागाने व्यक्त केला आहे.

# गुरु तेग बहादूर साहिबजींच्या ३५० व्या शहादत सोहळ्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना निमंत्रण

**जनसंचलन/बुलढाणा**

श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त हिंद दी चादरफ्फ्र हा भव्य व ऐतिहासिक कार्यक्रम २४ आणि २५ जानेवारी २०२६ रोजी नांदेड येथे आयोजित केला आहे. या सोहळ्याचे निमंत्रण केंद्रीय गृह तथा सहकार मंत्री अमित शाह यांना राज्यस्तरीय समागम समिती सदस्य यांनी प्रत्यक्ष भेटीदरम्यान दिले. नवी दिल्ली येथे राज्यस्तरीय समागम समितीच्या (महाराष्ट्र राज्य) पदाधिकाऱ्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची सदिच्छा भेट घेऊन निमंत्रण दिले. केंद्रीय गृहमंत्री शाह यांनी २५ जानेवारी रोजी आयोजित कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे निमंत्रण स्वीकारले. यावेळी पोहरादेवीचे महंत बाबुसिंग महाराज (सहअध्यक्ष), समन्वय समितीचे अध्यक्ष रामसिंग महाराज, नांदेड येथील गुरुद्वारा प्रशासक डॉ. विजय सतबीर सिंग, समन्वयक श्री. रामेश्वर नाईक, सहसमन्वयक जसपाल सिंग, सदस्य चरणदीप सिंग (हॅप्पीसिंग), सतिश निहलानी आणि सहनिमंत्रक तेजासिंग बावरी आदी उपस्थित होते. नांदेड येथील मोदी मैदान येथे आयोजित या सोहळ्याला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे २५ जानेवारीला दुपारी २ ते ५ या वेळेत उपस्थित राहणार आहेत. तसेच, पं. धीरेंद्र कृष्ण शास्त्री (बागेश्वर धाम सरकार) उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी देखील निमंत्रण स्वीकारले असून ते २४ जानेवारीला या सोहळ्याला उपस्थित राहतील, अशी माहिती समितीच्या वतीने देण्यात आली.

# बुलढाण्यात गुरुवारी(दि.२२) पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांना नोकरीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडेल करिअर सेंटर बुलडाणा यांच्या वतीने पंडीत दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन गुरुवार दि. २२ जानेवारी २०२६ रोजी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मलकापूर रोड, बुलढाणा येथे करण्यात आले आहे. या रोजगार मेळाव्यामध्ये सहयोग को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी व दास गॅस इक्विपमेंट या नामांकित उद्योजकांनी त्यांच्याकडील रिक्त पदे अधिसुचित केलेली आहे. सदर कार्यालयाकडे नोंदणीकृत उमेदवारांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने या रोजगार मेळावा घेण्यात येणार आहे. या मेळाव्यात नामांकित कंपनी प्रतिनिधीद्वारे गरजू व रोजगार इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेवून त्यांची प्राथमिक निवड करण्यात येणार आहे. तसेच नामांकित कंपनीमध्ये प्रत्यक्ष प्रशिक्षणाची संधी या मेळाव्याद्वारे उपलब्ध होणार आहे. दहावी, बारावी आयटीआय, पदविका(डिप्लोमा) तसेच कोणत्याही शाखेतील पदवीधर उमेदवारांनी आपल्या शैक्षणिक कागदपत्र व बायोडाटासह प्रत्यक्ष उपस्थित राहणे आवश्यक आहेत. तरी बुलढाणा जिल्ह्यातील जास्तीत जास्त उमेदवारानी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त ग.प्र. बिटोडे यांनी केले आहे.

# शेतकरी परदेश अभ्यास दौरा योजनेअंतर्गत शेतकऱ्यांचा पहिला गट परदेशात रवाना



**जनसंचलन/बुलढाणा**


कृषी विभागाव्दारे शेतकऱ्यांच्या ज्ञानवृद्धी व आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने शेतकरी परदेश अभ्यास दौरा योजना राबविण्यात येत आहे. योजनेअंतर्गत दि. १७ जानेवारी २०२६ रोजी मलेशिया, व्हिएतनाम व फिलिपाईन्स या तीन देशांचा परदेश अभ्यास दौरासाठी शेतकऱ्यांचा पहिला गट रवाना झाला. सन २०२५-२६ या वर्षात तीन अभ्यास दौरे नियोजित आहेत. त्यामध्ये युरोप, इस्राएल आणि मलेशिया, व्हिएतनाम, फिलिपाईन्स या देशांचा समावेश आहे. दौऱ्यातील सहभागी शेतकऱ्यांनी पुणे येथून मुंबई मार्गे पुढे प्रस्थान केले असून, या दौऱ्यामध्ये राज्यातील १५ प्रगतशील शेतकरी, १ कृषी विभागाचा अधिकारी तसेच १ प्रवासी कंपनीचा प्रतिनिधी सहभागी झाले आहेत. शेतकरी परदेशी दौरा निघताना कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून सहभागी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांनी परदेशातील आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा अभ्यास करून तो अनुभव राज्यातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावा, असे आवाहन केले. या अभ्यास दौऱ्यामध्ये सहभागी शेतकऱ्यांना आधुनिक शेती पद्धती, संरक्षित शेती, कृषी प्रक्रिया उद्योग, निर्यातक्षम उत्पादन तंत्रज्ञान, तसेच विविध देशांतील कृषी व्यवस्थापन व विपणन व्यवस्था यांचा प्रत्यक्ष अभ्यास करण्याची संधी मिळणार आहे. या अनुभवाचा उपयोग करून राज्यातील शेती अधिक उत्पादनक्षम व शाश्वत करण्यास मदत होणार आहे. विशेष बाब म्हणजे, सन २०१९ नंतर आयोजित करण्यात आलेला हा पहिलाच परदेश अभ्यास दौरा असून कृषी विभागाने पुन्हा एकदा ही महत्वाकांक्षी योजना प्रभावीपणे राबविण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे कृषी विभाग या उपक्रमाबाबत सकारात्मक आहे. कृषी विभागाच्या या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील शेती तंत्रज्ञानाची माहिती मिळून राज्यातील शेती विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास विभागाने व्यक्त केला आहे.



# महापौर निवडीआधीच घात? ठाकरेंचे चार नगरसेवक अचानक नॉट रिचेबल, घराच्या दरवाजावर...

**वृत्तसंस्था/ कल्याण**

कल्याण-डोंबिवली महापालिकेत शिवसेना उबाठा पक्षाला अनपेक्षित यश मिळाले, तरी ते टिकवणे त्यांना जमलेले दिसत नाही. सत्तास्थापनेसाठी गट स्थापन करण्यापूर्वीच त्यांचे चार नगरसेवक ‌‌ॉट रिचेबलफ झाल्याचे दिसत आहे. गटनेता निवडीसाठी आयोजित बैठकीला उपस्थित राहण्याचे पत्र स्वीकारण्यासाठी हे चार नगरसेवक उपलब्ध झाले नसल्याचे पक्षाच्या स्थानिक नेत्यांनी सांगितले. या नगरसेवकांच्या दरवाजावर जिल्हाप्रमुखांच्या सहीचे पत्र चिकटवण्यात आल्याचे शहरप्रमुख शरद पाटील यांनी सांगितले. दरम्यान, उर्वरित नगरसेवकांसह स्थानिक पदाधिकारी ङ्गमातोश्रीफ्र रवाना झाले असून तिथे कल्याण डोंबिवलीतील ठाकरे गटाच्या गटनेत्याच्या नावाची घोषणा केली जाणार आहे. शिवसेनेच्या ठाकरे गटातून निवडून आलेले मधुर म्हात्रे आणि ॲड. कीर्ती ढोणे हे दोन नगरसेवक शिवसेना शिंदे गटाचे कार्यकर्ते असून त्या पक्षातून तिकीट न मिळाल्याने त्यांनी उबाठाच्या माध्यमातून लढत देत विजय मिळवला. त्यानंतरही, त्यांनी आपल्या वरिष्ठांशी प्रामाणिक राहत निवडून येताच शिवसेना उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या भेटीआधीच खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचे आशीर्वाद घेतले आणि नंतर ते ङ्गनॉट रिचेबलफ झाले. यानंतर काही वेळातच प्रभाग क्रमांक ४ मधून निवडून आलेले राहुल कोट आणि प्रभाग क्रमांक ६ मधून निवडून आलेल्या स्वप्नाली केणे हे दोन नगरसेवक ङ्गनॉट रिचेबलफ झाले आहेत. हे दोन्ही मनसेचे कार्यकर्ते असून ते मनसेच्या नेत्यांना भेटण्यासाठी पोहोचले होते. त्यानंतर त्यांचा संपर्क होत नसल्याचे त्यांच्या कुटुंबीयाचे म्हणणे आहे. यामुळेच या चारही नगरसेवकांच्या कुटुंबीयांकडे ठाकरे गटाच्या नेत्यांनी पक्षाच्या बैठकीला उपस्थित राहण्याचा व्हिप वजा आदेशपत्र सोपविले आहे. आपल्याला व्हिप मिळालाच नसल्याचा दावा या नगरसेवकांकडून केला जाऊ शकतो. म्हणून या पत्रांची प्रत त्यांच्या दरवाजावरही चिकटवण्यात आल्याचे शहरप्रमुख शरद पाटील यांनी सांगितले. नगरसेवक निश्चित झाल्यानंतर महापालिका प्रशासनाकडून या



नगरसेवकांना गट स्थापन करून गटनेता निश्चित करण्याबाबत पत्र धाडण्यात आली आहेत. गटनेता निश्चित झाल्यानंतर, या गटांची नोंदणी कोकण विभागीय आयुक्तांकडे केली जाईल. या गटातील जो सर्वांत मोठा गट असेल, त्याला महापौर करण्याबाबत महापालिका सचिवांकडून पत्र धाडले जाणार आहे, असे महापालिका प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

---

## चिखली बायपासवर पुन्हा रक्तरंजित अपघात!

# दुचाकी दुभाजकावर आदळून ५० वर्षीय नागरिक गंभीर जखमी




**जनसंचलन/ चिखली**

जालना-खामगाव बायपासवरील अपघातांचे सत्र काही केल्या थांबत नसून आज पुन्हा एक भीषण अपघात घडला आहे. काजी ले-आउट कमानीसमोर दुचाकीचा तोल सुटून थेट दुभाजकावर आदळल्याने विजय दांडगे (वय ५०, रा. कोणड बुद्रुक, ता. जाफ्राबाद, जि. जालना) हे गंभीर जखमी झाले आहेत. आज रात्री सुमारे ७ वाजताच्या सुमारास ही दुर्घटना घडली. विजय दांडगे हे आपल्या मुलीला भेटण्यासाठी कोणड येथून दिवठाणा येथे गेले होते. दिवठाणा येथून परत आपल्या गावी जात असताना चिखली शहरालगत असलेल्या जालनाखामगाव बायपासवर अचानक त्यांच्या दुचाकीचा तोल सुटला. क्षणार्धात दुचाकी रस्त्याच्या मधोमध असलेल्या दुभाजकावर जोरात आदळली. या धडकेत दांडगे गंभीर जखमी झाले असून रस्त्यावर रक्ताचा सडा पडल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. अपघातानंतर तातडीने त्यांना डॉ. राऊत यांच्या दवाखान्यात दाखल करण्यात आले. मात्र प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याने डॉक्टरांनी त्यांना तात्काळ संभाजीनगर येथे रेफर केले आहे. विशेष म्हणजे, हा बायपास अपघातांचा हॉटस्पॉट ठरत असून वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

---

# मोताळ्यात थरारक अपघात! तूर मळणीसाठी गेलेले ट्रॅक्टर उलटले, तरुणाचा जागीच मृत्यू

**जनसंचलन/मोताळा**



तालुक्यातील सहस्त्रमुळी तांडा शिवारात ट्रॅक्टर उलटून झालेल्या भीषण अपघातात एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर दुसरा तरुण गंभीर जखमी झाला आहे. ही दुर्दैवी घटना रविवार दिनांक १८ जानेवारी रोजी सायंकाळी सुमारे ४.३० वाजताच्या सुमारास घडली. सध्या तूर मळणीचा हंगाम सुरू असून, मळणी यंत्र (थ्रेशर) जोडलेले ट्रॅक्टर (क्रमांक एमएच २८ एजे ७२१९) एका शेतातील तुरीची मळणी करून दुसऱ्या शेताकडे जात होते. शेतातील वळणावर चालकाचे नियंत्रण सुटल्याने ट्रॅक्टर आणि मळणी यंत्र अचानक उलटले. यावेळी ट्रॅक्टरखाली दबून सौरव हरिश्चंद्र जाधव (वय २२, रा. सहस्त्रमुळी) या तरुणाचा घटनास्थळीच मृत्यू झाला. या अपघातात महेश मोतेसिंग जाधव (वय २०) हा तरुण गंभीर जखमी झाला असून त्याला तत्काळ उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच बोराखेडी पोलीस घटनास्थळी दाखल झाले व पंचनामा करून पुढील कारवाई सुरू केली आहे. या अपघाताने परिसरात शोककळा पसरली असून नागरिकांकडून हळहळ व्यक्त केली जात आहे.

---

# कामावरून घरी परतून फेरफटका मारायला बाहेर पडले आणि काळाने झडप घातली!

**जनसंचलन/मलकापूर**

रस्ते अपघातांचे सत्र थांबण्याचे नाव घेत नाही. भरधाव वेग, निष्काळजी वाहनचालक आणि प्रशासनाची ढिसाळ वाहतूक व्यवस्था याचा आणखी एक बळी मलकापूरात गेला आहे. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वर मलकापूर शहराजवळ घडलेल्या भीषण अपघातात एका निष्पाप पादचाऱ्याचा जागीच मृत्यू झाला असून परिसरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. कामावरून घरी परतल्यानंतर नेहमीप्रमाणे



संध्याकाळचा फेरफटका मारण्यासाठी बाहेर पडलेले अनिल (वय ४५) रस्ता ओलांडत असतानाच नागपूरहून मुंबईकडे भरधाव वेगात जाणाऱ्या अज्ञात वाहनाने त्यांना जबर धडक दिली. धडकेचा जोर इतका भीषण होता की अनिल तब्बल १५ ते २० फूट हवेत उडून थेट रस्त्यावर कोसळले. डोक्याला गंभीर मार लागून मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाला आणि काही क्षणांतच त्यांचा घटनास्थळी मृत्यू झाला. अपघातानंतर वाहनचालक पळ काढत असल्याने संतप्त नागरिकांनी महामार्गावर तीव्र संताप व्यक्त केला. दोन चिमुकल्या मुलींच्या डोक्यावरून वडिलांचं छत्र हरपल्याने हळहळ व्यक्त होत आहे. या महामार्गावर अपघात रोखण्यासाठी प्रशासन नेमकं काय करतंय, असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८